# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्र.:- ०७१२-२५५७२७२
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/शैवि-ईबीसी/2018/ 3380

10 OCT 2018

प्रति,
प्राचार्य /संचालक,
सर्व शासकीय,खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग.

विषयः- शैक्षणिक वर्ष 2018-19 करीता "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" व "डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता" योजनांचे अर्ज नव्याने सुरू झालेल्या Mahadbt Portal भरण्यांबाबत.

उपरोक्त विषयांन्वये शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनांचे अर्ज नव्याने सुरू झालेल्या Mahadbt Portal भरण्यांकरिता Clerk Login व Principal Login वर खालील दिलेल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची संस्थांस्तरावर ऑनलाईन अर्जाची पडताळणी करुनच संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज Approved करुन विभागीय कार्यालयास Forward करण्यांत यावा.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनाः-**

*विद्यार्थ्यांचे कॅप लेटर (admission confirmation letter)

* विद्यार्थ्यांच्या कुंटुबाचे (आई व वडील दोन्ही मिळुन) उत्पन्न मर्यादा रु. 8 लाखापर्यंत लागु राहील.

* उत्पन्नाचा दाखला (2017-18) हा संबंधित नायब तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरीचा असावा.

*ज्या विद्यार्थ्यांचे वडील हयात नसतील, तर वडीलांचे मृत्यु प्रमाणपत्र सादर करावे. अशावेळेस विद्यार्थ्यांच्या आईचे उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यांत येईल. तसेच आई व वडील दोन्ही हयात नसतील, अशा विद्यार्थ्यांच्या संबंधित पालकांचे उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यांत येईल. तसेच अशा विद्यार्थ्यांच्या पालकांनी Gaurdian म्हणुन त्यांनी रु.100/- स्टॅप पेपर वर हमीपत्र सादर करावे.

* संबंधित शैक्षणिक कागदपत्रे जसे- **Leaving certificate, Marksheet, Gap certificate.**

*जर विद्यार्थ्यांने 12 वी च्या आधारे Direct 2 year Diploma मध्ये प्रवेश घेतला असेल, तर त्यांनी 11 वी व 12 वी मध्ये संबंधित शाळेतुन ईबीसी घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यांत यावे.

*सदर योजना ही कुंटुबातील दोन अपत्यांपर्यंत मर्यादीत असल्यामुळे, विद्यार्थ्यांच्या पालकांनी राशनकार्ड किंवा रु.100/-च्या स्टॅप पेपर वर हमीपत्र सादर करावे.

*कुंटुबातील एकुण अपत्यांपैकी कोणत्याही दोन अपत्यांना या योजनेचा लाभ घेता येईल, त्याकरिता बाकी अपत्यांनी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतला नसल्याचे हमीपत्र सादर करावे.

**डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता: -**

*वरील प्रमाणे सर्व कागदपत्रे.

*विद्यार्थ्याच्या पालकांचे अल्पभुधारक प्रमाणपत्र हे सक्षम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरीचा असावा. अथवा विद्यार्थ्यांचे पालक हे रोजगार हमी कायदा अंतर्गत नोंदणीकृत मजदूर असावा.

*विद्यार्थी हा वसतिगृह मध्ये राहत असल्याचे प्रमाणपत्र तसेच विद्यार्थी जर भाडयांनी राहत असल्यास घर-मालकांचे 100% स्टॅप पेपरवर हमीपत्र (Rent Agreement) सादर करावे.

*जर विद्यार्थ्यांचे पालक हे अल्पभुधारक शेतकरी अथवा नोंदणीकृत मजदूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या कुंटुबांचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. 1 लाखपर्यंत अथवा त्यापेक्षा कमी आहे, असा विद्यार्थी या योजनेंस पात्र राहील.

विद्यार्थ्यांनी वरीलप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेले ऑनलाईन अर्जाची काटेकोरपणे पडताळणी करुन सदर अर्ज मान्यतेकरिता या कार्यालयास पाठविण्यांत यावा. विभागीय स्तरावरील पडताळणीमध्ये विद्यार्थ्यांचे अर्जामध्ये काही त्रुटी आढळुन आल्यास संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज थेट रिजेक्ट करण्यांत येईल व याबाबतची जबाबदारी प्राचार्य/संस्था प्रमुखांची राहील. तदनंतर सदर विद्यार्थ्याचा अर्जाचा विचार केला जाणार नाही, यांची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपुर

E/SAPNA KOWE/OFFICE LETTER/INSTT. 2017-18